# श्रद्धेचा महाराक्षस डला पाहिजे

**अंधश्रद्धेच्या चिखलात रुतून बसलेला समाज- ाला बाहेर काढावयाचा असेल तर फार मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक परिवर्तनाचा कार्यक्रम हाती घ्यायला पाहिजे.**

"आईच्या नावानं चांगभले ! उदे उदे ! ही पुडी घ्यायची त्यातली जरा पाण्यातून प्यायला द्यायची. आणि राहिलेली पुडी खिशात ठेवायची मग बघ तुझा मुलगा सकाळी चालायला लागतोय. मात्र त्याला बरं वाटलं की, एक दोन पायाचं जितं पिलू नेऊन सोड." हे चाललं होतं एका घरात. तिथे एका बाईच्या आली होती अंगात 'आई'. तिच्या भोवती २०।२५ स्त्रिया पुरुष घोळका करून बसले होते. कुणाची बायको नांदत नव्हती, कुणाच्या पोटात दुखत होतं तर कुणाचं आलेल्या पैशात भागत नव्हतं. म्हणून प्रत्येकजण आईपाशी तक्रार करीत होता. आई घुमत होती आणि भक्तांनी विचारलेल्या प्रश्नांवर उपाय सुचवित होती. अंगाऱ्याच्या पुड्या देत होती. अंगारा कसला तर राख, आणि भक्त नारळ, खडीसाखर देत होते आईला.

चार लोक जमले, चार नारळ जमले, धुपाचा धूर निघू लागला की देव लागला घुमायला एरवी नाही. असा हा देव आणि त्याच्या नादी अगदी स्वतःला सुशिक्षित समजणारे लोकही लागलेले दिसतात. अगदी पोरगा तापाने आजारी पडला, तर त्याचा ताप डॉक्टराचं औषध आणलं तर लगेच उतर- णार नाही. तो मुलगा जर अशक्त असेल (सध्या महा- गाईमुळे सकस आहार कित्येक कुटुंबं आपल्या मुलांना देऊच शकत नाहीत) तर त्याचा ताप उतरायला चारापेक्षा अधिक दोन दिवस लागणारच. पण आम्हा स्त्रियांना तेवढा दम 'निघतच नाही. सकाळी इंजेक्शन दिले की संध्याकाळी ताप कमी आलाच पाहिजे ही मनाशी खूणगाठ. ताप उतरला नाही की चाललो आम्ही देवऋषाकडे. तो देतो पुडी. ती पुडी आणली की आम्हाला समाधान झालेच म्हणून समजावे.

सकाळी डॉक्टरांच औषध इंजेक्शन झालेलं असतं. त्याचा हळूहळू प्रकृतीवर परिणाम होत चाललेला असतो. दुसऱ्या दिवशी मुलाला थोडा आराम पडतो, तो आराम डॉक्टरांच्या औषधाने झाला हे आपण मानायला तयार नसतो. रात्री आणलेली अंगाऱ्याची पुडी हे त्याचे कारण. मग थोडा फरक पडलाय आता देवाची शांती कशी करायची, हे विचारायला पुन्हा दुसऱ्या दिवशी देवऋषाकडे. मग त्याची म्हणजे त्याच्या अंगात येणाऱ्या आईची ओटी भरायची हे आलंच.

अशा या आपल्या समाजातील अंधःश्रद्धा. अगदी मी डोळ्याने पाहिलेली, अनुभवलेली घटना सांगा- वीशी वाटते. या घटना गल्लोगल्ली घराघरातून घडत असतात, घडत आहेत. एक बाई आहे. तिला घरात कशाची कमतरता नाहीच. पण ती सारखी आजारी. खरं म्हणजे आजार तसा काहीच नाही, असमाधानी वृत्ति हा तिचा खरा आजार पण त्यावर उतारा काय ठरला ? यल्लमा देवीची तुमच्यावर छाया आहे, तिला तुमच्या घरात बसायचं आहे. झालं. नवऱ्याच्या मनात नव्हतं तरी रुसून, भांडून त्याला कसतरी तयार केलं. आता ती बसवायची कशी ? नुसती बाजारातून मूर्ती आणून तिला बसवायची नाही. जागरण–गोंधळ आला म्हणजे जोगती आले, वाजंत्री आले आणि आपण देव बसवले हे लोकांना कळायला पाहिजे म्हणून १०० लोकांचे जेवण आहे. हे सगळं केलं आणि यल्लमा देवी बसवली, पण गुण नाही.

आता दुसरीने सांगितले हातात चुडा असताना तू नदीवर गेलीस तिथं सात आयाची तुझ्यावर नजर गेली. तेव्हापासून तुझ्या वळचणीला येऊन बसल्यात त्यांना घरात घे. झालं बाईच्या मनात भरलं पण नवऱ्याच्या मनात भरेना. तेवढ्यात मुलगा आजारी पडला. तेव्हा आईने सांगितले बघ तू मला घरात घेईनास म्हणून हे असं. बाईने आपल्याजवळचे शे–पाचशे रुपये काढले नि नदीवरून वाजत–गाजत आयांना आणून बसविलं जिच्या अंगात आया येतात तीही रस्त्याने वाजत, गाजत, सगळ्या गावाचा नमस्कार घेत, पायावर पाणी घेत घुमत घरापर्यंत आली. घरात तोपर्यंत मुलगा जास्त आजारी. आता ? आलं का देवावर अपयश ! बाईने घाबरून मुलाला दवाखान्यात नेले तर मुलाच्या पायाचे ऑपरेशन करावे लागले. जर अजून चार आठ दिवस देव देव करीतच ती बाई बसली असती तर त्या मुलाचा पाय कापावा लागला असता!

अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. कुणाच्या अंगात म्हसोबा, तर कुणाच्या अंगात भैरोबा तर कुणाच्या अंगात देवी. असे हे देवऋषि. एका देवाला अनेक नाव लावून आपली पोटे भरणारे. एक देवी पण तिला अनेक नावे. तुळजा, भवानी, अंबाबाई या मुख्य आहेतच पण त्यांची अनेक रुपे. टेंबलाई, मरगुबाई, फिरंगाई, यमाई, वाघजाई, यलुबाई ही त्यांची नांवे. तर काही ठिकाणी बिन नावाच्या आया आहेतच. मोठी आई, साती आसरा (म्हणजे सात आया) डोंगराई अशा या आया. एक नाव, एक देव राहिला तर त्यावर कोण विश्वास ठेवील ? आता बसं टेंबलाईने गुण नाही आला तर फिरंगाई आहेच. फिरंगाईनेही आला नाहीच तर आणि दुसऱ्या आया आहेतच.

अशा या आया, महाआया, कोण डोंगरावर तर कोण माळावर. अशा या आयांची सेवा करण्यासाठी मुलं, मुली, जास्तीत जास्त मुली सोडण्याचे प्रकार खूपच पाहावयाला मिळतात. मग कुठल्या देवाला त्यांना जोगती म्हणतात. तर म्हणे कुणाला म्हणतात. या सोडलेल्या मुलांमुलींनी फक्त सेवा करायची. त्या आता देवाच्या झाल्या. या सोडण्याच्या प्रकारात मुलींची संख्या जास्त कशी तर मुली नवसाच्या म्हणून सोडल्या जातात. त्यांनी लग्न करायची नाहीत. त्यांचं म्हणे देवाशी नात जोडलं गेलेलं असतं. मग त्यातून व्यभिचाराला सुरुवात होते. व्यभिचार म्हटलं की मग मुलं ही जन्माला येणारच. मग जोगतीणीच्या मुली म्हणून त्यांच्याबरोबर कोण लग्नाला तयार होणार ? त्यांनीही मग देवाचीच सेवा करायची, व देवाचे सेवक या नावावर गावोगाव फिरायचं जोगवा मागत.

पोटाला पुरेल असा जोगवा कधी त्यांना मिळाला नाही की मग त्या मुलींच्याकडे दुसरे मार्ग काय ! धड शिक्षण नाही आणि देवदासी म्हणून काही हलके कामही करता येत नाही. मग सगळ्यात सोपा उपाय म्हणजे मग हे अंगात येण्याचे प्रकार आणि काही वेळा तेही जमत नाहीत म्हणून मग व्यभिचार, वेशाव्यवसाय.

तर अशा देवदासी बनवायच्या आपणच आणि वेश्याही बनवायच्या आपणच. अशी ही आमच्या अंधश्रद्धेची फळं मिळत आहेत.

डॉ. बाबा आढावांसारख्यांनी जातीने लक्ष घातले आहे, परंतु त्यांना समाजाची म्हणावी तशी साथ मिळालीच नाही. अंधश्रद्धेच्या या चिखलात रुतून बसलेला हा समाजगाडा बाहेर काढावयाचा असेल तर त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक परिवर्तनाचा कार्यक्रम हाती घ्यायला पाहिजे.

— शकुंतला पोतदार,
कोल्हापूर.